Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-4 | Issue-2 | Aug-2014 Available online at www.aygrt.isrj.net

# विंदा करंदीकरांच्या कवितेचे वेगळेपण

किरण नामदेव पिंगळे

सारांश - अनेक दशके बालकवितांपासून वेगवेगळे साहित्यप्रकार लीलया हाताळणारे शब्दप्रभू आणि मराठीला 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळवून देणारे ज्येष्ठ साहित्यिक गोविंद विनायक करंदीकर हे साहित्यविश्वात 'विंदा करंदीकर' म्हणून परीचित आहेत. विंदा हे मूळचे कोकणातले असल्याने कोकणी माणसाची स्वभाववैशिष्टे त्यांच्या प्रत्येक कृतितून दिसतात. विंदा करंदीकर हे इंग्रजीचे प्राध्यापक होते.

**प्रस्तावना-**

परंतु विंदानी स्वतःला ठराविक चौकटीत कधीच कधीच बांधून घेतले नाही. राष्ट्रीय स्तरावर 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळवून देऊन करंदीकरांनी महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे. विंदांचा चित्रपट म्हणजे प्रपंचात राहून परमार्थ करणाऱ्या पुरुषांच्या चित्रपटासारखा आहे. ते संत नव्हते, पण संतत्वाची मेख त्यांना माहीती होती. तसे ते आडदांड होते, पण त्यांच्या अंतरी दु:खी व दुर्बळाविषयी कधीच न आटणारा प्रेमाचा झरा होता. विंदा करंदीकरांचे वेगळेपण म्हणजे अठराविश्व दारिद्रयाचे दर्शन त्यांनी आपल्या आयुष्यात भोगले आहे. विंदा करंदीकरांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्टय म्हणजे अतिरेकी साधेपणा, टुकीने प्रपंच करण्याबद्दलचा कटाक्ष, शिष्ट आणि उच्चभ्रू लोकांपेक्षा आपण वेगळे आहोत हे ते आपल्या वागण्या बोलण्यातून सिद्ध करीत असत. विंदा करंदीकरांनी आपल्या वेदना पचवलेल्या होत्या पण त्यातून निर्माण झालेल्या संवेदना मात्र त्यांच्या मनाला पोखरत असत. आपल्या कवित्वाने महाराष्ट्राचा निसर्ग खेळता व हसरा ठेवणारे हे कवी संत जाणिवेचे आहेत. त्यामुळे समाजातील जीवन जाणिवांचे प्रतिबिंब, निसर्गाचे प्रतिबिंब, त्यांच्या साहित्यातून संपूर्ण भारताला पाहायला मिळाले. व्यक्तिच्या जीवनापासून ते मरणापर्यंत आयुष्यात प्रत्येक जीव, प्राणीमात्र यांच्यामुळे जे सजीव सृष्टीत बदल होतात आणि हसणे, रडवणे, बहरणे, कोसळणे हे सर्व ऋतू व्यक्तिंच्या जीवनात निर्माण करतात, त्या महान संतांच्या ऋणात राहणे व जीवनाला, संकटाना, आनंदाला सामोरे जाणे हेच या कविच्या लेखनातून प्रत्ययाला येते. १९९१ साली विंदा करंदीकरांना 'कबीर पुरस्कार' जाहीर झाला. मराठी भाषेतील या थोर कवीची निवड त्या वर्षी या पुरस्कारासाठी झाली. राष्ट्रीय स्तरावरचा सर्वोच्च सन्मान विंदांना मिळाला. विंदा करंदीकरांनी जागतिक साहित्यातले उत्तमोत्तम ग्रंथ साक्षेपाने वाचले. परंतु साहित्याखेरीज तत्वज्ञानाची भारतीय आणि पाश्चात्य दर्शने त्यांनी मर्मज्ञतेने अभ्यासली आहेत. एम. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजीचे अध्यापन करताना प्लेटो शिकवायला ते खुशीने तयार असत. त्यांची बुद्धी गणितातही उत्तम चालत असे, तसेच बुद्धीबळही ते कसलेल्या खेळाडूंसारखे खेळत. सर्व थोर मंडळी विंदांना सोयया धाययांसारखी वाटत, मग ती कोणत्याही देशातील असोत की काळातील असोत, अशा सोययात तुकोबाराय होते व कबीरही होते. त्यांच्या अंतरी दु:खी-दुर्बलांविषयी कधीच न आटणारा झरा होता. मात्र त्याला कोणी करुणा वगैरे गुण बहाल करू लागले तर त्यांनी ते झिडकारून

टाकले असते. ते संसारिक तर अव्वल दर्जाचा होते. कारण ३० पैशाची जुडी एक मैल चालत गेल्यावर २५ पैशांना मिळत असेल तर, ती महान काटकसर करण्यासाठी ते खुशाल पायपीट करीत असत. विंदांचा स्वभाव म्हणजे अतिरेकी साधेपणा, नेकीने प्रपंच करण्याबद्दलचा त्यांचा कटाक्ष, शिष्ट आणि उच्चभ्रू लोकांपेक्षा आपण वेगळे आहोत हे सिद्ध करण्यासाठी आपल्या रांगड्या साधेपणाचं तो नको तेवढं दर्शन घडवितात. त्यासाठी वचावचा बोलतील, घटामटा पेय पितील, बकाबका खातील. विंदा करंदीकरांनी लहानपणी खूपच सोसलं आहे. कोकणातल्या अठराविश्व दारिद्र्याचं कौतुक ऐकावं तर त्यांच्याकडूनच. कोल्हापूरला वारावर जवत आपण शिक्षण कसं पूर्ण केलं हे ते नेहमीच सांगत असत. गरिबीचे चटके सोसणं आणि अपमान गिळणे या गोष्टी कोणालाही आयुष्यभर दु:खच देणाऱ्या आहेत, त्यामुळे विंदांनाही त्याचे खूप दु:ख होते असे. विंदा करंदीकरांनी आपल्या वेदना पचवलेल्या होत्या आणि त्यातून निर्माण झालेल्या संवेदना मात्र त्यांच्या मनाला पोखरत होत्या. हे चरित्रनायक धडपडत शिकले व शिक्षण पूर्ण होताच शिक्षकाचा पेशा स्वीकारला. विंदांचे मित्र माधव ज्यूलियन हे दोघे गुरु-शिष्य. माधव ज्यूलियनांकडून विंदांना खूप काही शिकता आले.

हैद्राबाद, भागानगर सत्याग्रहात चार महिने विंदा तुरुंगातही होते. नात्यातल्या मुलीशी त्यांचा विवाह झाला पण दोन वर्षांच्या आतच तिचं निधन झालं. त्यानंतर हे भरकटत गेले, ३ आंदोलनात ही सहभागी झाले, चरखा चालवला, स्वतः विणलेल्या सुताची खादी वापरली, भारत छोडो आंदोलनातही सहभागी झाले. शास्त्रीय संगीत, तबला शिकले, नंतर कार्लमार्क्स वाचन केल्यावर हे संघाकडून कम्युनिस्टांकडे गेले. १९४७ साली विंदांच्या जीवनात द्वितीय पत्नी सुमाताई आल्या आणि त्यांच्या दुर्दैवाचे दशवतार उत्तरोत्तर कमी झाले. सुमाताई शाळेत शिक्षिका होत्या. सुमाताईंनी स्वत:चा सात महिन्यांचा पगार वाचवून १९४९ मध्ये 'स्वेदगंगा' हा विंदाचा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला, कर्तृत्वाची अनेक क्षेत्र काबीज करीत विंदांनी मराठी साहित्य विश्वात असाधारण स्थान मिळवलं.

बागलकोट, रत्नागिरी, कागल, बेळगाव येथील महाविद्यालयात इंग्रजीचे अध्यापन करीत करीत विंदा मुंबईला येऊन स्थिरावले. अध्यापन आणि अध्ययन निष्ठेने केले. विंदांनी केलेले जागतिक अभिजात साहित्याचे अनुवाद, तसेच 'परंपरा आणि नवता' हे समीक्षालेखन केले. १९६७ साली विंदा शिकागो युनिव्हर्सिटीत सिनीयर फुलब्राइट स्कॉलर म्हणून गेले. सतत चाळीस वर्षे त्यांनी आपल्या कवितांचे जाहीर वाचन केले. बापट म्हणतात-"मंगेश पाडगावकर, वसंत बापट, विंदा करंदीकर या त्रयींचं नातं सलगीचं आहे. बरोबरीचे आहे. तिघापैकी प्रत्येकाला स्वकर्तृत्वातून उपजलेला अहंकार समानच आहे ". गझल, गीत, मुक्तसुनित, तालचित्रे, विरूपिका असे जुने काव्यप्रकार विंदांनी समर्थपणे हाताळले. विंदांच्या बालकविता ह्या अनन्यसाधारण आहेत. 'एकदा काय झाले', 'सशाचे कान', 'एटू लोकांचा देश', 'परी ग परी', 'अजबखाना', 'सर्कसवाला', 'पिशीमावशी आणि तिची भूतावळ', 'अडम तडम', 'टॉप', 'सात एके सात', 'बागुलबुवा' हे त्यांचे बालकाव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. बालविश्वाशी समरस होवून नाविन्यपूर्ण अशी कल्पनाशक्ती वापरून अनेक भन्नाट बालकविता विंदा करंदीकर यांनी लिहिल्या. प्रयोगशिलता हे विंदांच्या काव्याचे महत्वाचे वैशिष्टय आहे. कवी विंदा करंदीकर यांच्याविषयी मंगेश पाडगावकर म्हणतात , करंदीकरांची कविता प्रयोगशील आहे. त्यांचे सामाजिक, राजकीय तत्त्वज्ञान मार्क्सिस्ट संस्कारांचे होते. त्यामुळे प्रचाराचे बांडगुळ टाळून सामाजिक, राजकीय कविता लिहिणे कठीण होते पण विंदांमधल्या कलावंताने हे आव्हान यशस्वीपणे पेलले. त्यांच्या कवितेची शैली ही वक्तृत्वपूर्ण आहे. पण तरीही ती भाषणबाजी करीत नाही. करंदीकरांची प्रकृती ही तेचतेच दळण यशस्वीपणे दळत.

राहणाऱ्या माणसाची नाही. तो सतत काहीतरी नवीन शोधत असतो. नव्या अनुभवांना भिडत असतो. काही वेळा छंदांची मोडतोड करूनही आपला वेगळा छंदिष्टपना प्रकट करीत असतो. करंदीकरांमध्ये जसा एक कवी आहे तसाच एक तत्वचिंतकही आहे.कविता,

ललित, निबंध, समीक्षा इंग्रजीतील मौलिक ग्रंथांची भाषांतरे अशा विविध अंगांनी करंदीकरांनी थोर साहित्यसेवा केली आहे. तेव्हा त्यांना मिळालेले

'ज्ञानपीठ' हे या सेवेसाठी व्यक्त केलेली कृतज्ञताच आहे. विंदांनी प्रयत्नपूर्वक अनघडपण जपले होते. बोलण्या- वागण्यात दांडगट पण आणि रांगडे व्यक्तिमत्व , पट्टीचे ज्ञानी पण वितंडवाद घालण्यात अट्टल , मनाचे उदार पण आपल्या कंजूष कथांना खाद्य पुरवणारे, धसमुसळेपणा पण मुलांवर मायेची पखरण करणारे, सर्वांत महत्वाचे म्हणजे अतिशय उत्कट सच्चेपना, ओतप्रोत भरलेले मन, बेकिरीपणा बेमालूमपणे वठवणारे. घरसंसार सांभाळत असताना 'चिंता करितो विश्वाची' असे व्रत आजन्म घेणारे विंदा होते. विंदांच्या कवितेत एकाच वेळी सामर्थ्य आणि सुकोमालता, विमुक्तपणा आणि संयम, अवखळपणा आणि मार्दव, गांभीर्य आणि मिस्किलपणा आणि प्रगाढ वैचारिकतेबरोबरच नाजुक भावसौंदर्य यांचा एकदम प्रत्येय येतो.

संदर्भ

1. 'स्वेदगंगेचे परीक्षण' (विंदा करंदीकर), 'साधना' : १४ जानेवारी १९७०
2. कवींचा कवी विंदा करंदीकर 'साधना' : दिवाळी १९९१
3. विकिपीडिया मुक्त ज्ञानकोश